**वेळ : ३ तास** **गुण : १००**

**सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**

**३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

प्र. १ अ) मध्ययुगीन मराठीतील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मराठीचा उत्पत्तीकाल स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

ब) "महानुभाव संप्रदायाने मराठी गद्याची वैभवशाली परपंरा निर्माण केली", या विधानाची साधकबाधक चर्चा करा.

प्र. २ अ) तेराव्या शतकातील भक्तीसंप्रदायाच्या धार्मिक आणि सामाजिक योगदानाचा सविस्तरपणे आढावा घ्या. (२०)

**किंवा**

ब) संत ज्ञानेश्वर- संत नामदेवकालीन संतमेळ्याच्या वाङ्मयीन योगदानाचा परिचय करून द्या.

प्र. ३ अ) मध्ययुगीन कालखंडातील संत एकनाथांच्या काव्याचे स्वरूप विस्तृतपणे स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

ब) संत तुकारामांच्या अभंगगाथेतील विविध प्रकारच्या अभंगांचे सविस्तर विवेचन करा.

प्र. ४ अ) पंडिती काव्याच्या प्रेरणा आणि स्वरूप स्पष्ट करून पंडिती काव्यातील गुण-दोषांची चर्चा करा. (२०)

**किंवा**

ब) वामन पंडित आणि रघुनाथ पंडित यांच्या काव्यरचनेचा सविस्तरपणे परिचय करून द्या.

प्र. ५ टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)** (२०)

१) लीळाचरित्र
२) ज्ञानेश्वरांची ग्रंथरचना
३) शिवकालीन महाराष्ट्र
४) निरंजन माधव

******************



XROYADMINYFD0E70XROYADMINYFD0E70XROYADMINYFD0E70XROYADMINYFD0E70